२८८७

बा. वा.
नों. क्र. २९७

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २९७ दिनांक .......
विषय किशोर क्र. २७६

BVBK-0400297

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
बा. क्र. २९५ दिनांक ......
विषय किशोर क्र. २५६

# भारती

मनोहर हि. सरदेसाई

BVBK-0400297
BVBK-0400297

किंमत तीन रुपये

प्रकाशक
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य,
१२५७ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

© मनोहर हि. सरदेसाई

मुद्रक
सौ. कमल रामचंद्र घळसासी
संजीव मुद्रणालय,
४६९ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०.

पूज्य गुरुवर्य

श्री. गणेश शिवराम सामंत

ह्यांच्या

निष्ठापूर्ण जीवनास

ह्या संग्रहातील 'देवदूत' ह्या कथेची मध्यवर्ती कल्पना
Oscar Wilde ह्या लेखकाच्या Happy Prince
ह्या गोष्टीवरून घेतलेली आहे.

# सप्तर्षि

फार प्राचीन काळची गोष्ट. एक आटपाट नगर होते. नगरातील सगळे लोक अतिशय सुखी होते. आबालवृद्ध निरोगी होते. घरे संपत्तीने समृद्ध होती.

त्या नगरात एक राजा होता. अतिशय बलाढ्य, पराक्रमी, नि तसाच उदार. प्रजेवर त्याचे पुत्रवत् प्रेम होते.

राजा आणि राणी सुखात कालक्रमणा करीत होती. दिवसेदिवस त्याचे राज्य वृद्धिंगत होत होते व राजवाड्यात नव-नवीन बालक जन्माला येत होते. राजाच्या हर्षाची चंद्रकोर पूर्णपणे वाढीस लागली होती.

सातही राजपुत्र सतेज, सरल नि साहसी असे होते. एकमेकांवर त्यांचे अतिशय प्रेम होते. त्यांचा बंधुभाव पाहून राजाराणीला धन्यता वाटे.

बाल्यावस्थेतून ते राजपुत्र आता कौमार्यावस्थेत आले होते. क्षत्रियांना शोभेसे युद्धकलेचे शिक्षण ते घेत होते.

त्या राज्यात एक वाईट चाल होती. लढाईत जय मिळावा म्हणून वर्षाला एकदा देवीला नरबलि देण्यात येत असे.

नरबलि देण्याचा मोठा उत्सव दरवर्षी साजरा करण्यात येत असे. ती हत्या पहाण्यास लोकांची कोण गर्दी होई! रक्ताचा टिळा आपल्या कपाळी लावण्यात लोकांची मोठी चुरस लागे!!

त्या अल्पवयी राजपुत्रांनी पुष्कळ वेळा असले बलिदानाचे समारंभ पाहिले होते. पण ते समारंभ पाहून त्यांना आनंद होत नसे. त्यांना वाटे की कुठेतरी त्या माणसांचे चुकत आहे. ज्या दिवशी तो समारंभ होई त्या दिवशी त्यांना चैन पडत नसे, जेवण रुचत नसे, मनाला सुख वाटत नसे. त्यांच्या सात्विक मनाला रुखरुख लागून राही.

राणी आठव्यांदा गरोदर राहिली. राणी मोठ्या भाग्याची. राणी अष्टपुत्रा होईल म्हणून राजालाही खूप आनंद झाला.

एके दिवशी राजा एकटाच मृगया करण्यासाठी रानात गेला. पण दुर्दैवाने त्याला कसलीच शिकार मिळाली नाही. संध्याकाळ झाली होती. चोरपावलांनी रात्र त्या अरण्यात शिरत होती. झाडे निश्चल होती. भोवताली काळोख पडत चालला होता. नि निराश झालेल्या माणसाच्या हृदयात अखेरची आशा लुकलुकावी तशी, एकच तारका आकाशाच्या काळसर नीलिमेत चमकत होती. राजा घोड्यावर स्वार होता. घोडा धीरे धीरे चालत होता. पराभूत झालेला सेनापती रणांगण सोडून ज्या संत्रस्त मनःस्थितीत परत येतो त्याच बेचैन मनःस्थितीत राजा मार्ग आक्रमीत होता.

असाच काही वेळ गेला. घोडा वाट चुकून अरण्याच्या आड भागात शिरला हेही राजाला समजले नाहीं.

इतक्यात राजाला एक मोठे वारूळ दिसले. चांगले पुरुषभर उंचीचे ते वारूळ होते. पहाता पहाता त्या वारुळाच्या मागे त्याला कसली तरी हालचाल चालली असल्याचा भास झाला. अरण्यात आणि तशा त्या कातर वेळी माणूस फिरकणे शक्य नव्हते, म्हणून राजाने धनुष्यावर बाण चढविला, आवाजाकडे कान लाविले व बाण सोडला. पण जे राजाला कळले नाही ते घोड्याने जाणले. शिकारीच्या कामी तयार असलेला घोडा,



बाण सोडताच, जोराने खिंकाळला, मान हलवून पुन्हा खिंकाळला. राजाच्या छातीत धस्स झाले. काहीतरी अनुचित प्रकार घडला हे राजाने ताडले. तो पुढे गेला ......काय होते पुढे ?......आज पहिल्यांदाच राजा घाबरला......आणि शरमलाही.

त्या पुरुषभर उंचीच्या वारुळामागे एक जटाधारी तपस्वी आडवा पडला होता. क्षीण आणि गौर होती त्याची तनु. शुभ्र असे केस व

रुद्राक्षाच्या माळा होत्या त्याच्या गळ्यात. राजाने मारलेला बाण त्याच्या मानेत रुतला होता व जमिनीवर रक्तच रक्त झाले होते.

राजा खाली वाकला व त्या तपस्व्याचे शिर त्याने आपल्या मांडीवर घेतले. जवळच्या कमंडलूतून थोडे पाणी घेऊन ते त्या तपस्व्याच्या मुखात घातले. तपस्वी सावध झाला. सावध होऊन त्याने राजाकडे पाहिले... त्याची दृष्टी पाहून राजा मनात चरकला. दिवा विझताना मोठा होतो, तशी वाटली त्याला ती दृष्टी. त्या विझणाऱ्या अग्निकुंडातील तेज आपणाला भस्मसात् करील की काय अशी कटु शंका राजाच्या मनात उभी राहिली.

" राजा, तू दुष्ट आहेस. " तपस्वी बोलत होता. खोल विहिरीतून कुणी बोलावे तसे वाटले राजाला ते शब्द ऐकून. " राजा, आज तू माझा खून केलास. पण मृत्यूला कवटाळणाऱ्या ह्या ब्राह्मणाचा शाप तुला बाधल्याशिवाय राहणार नाही. राजा, आजपर्यंत तुझ्या सौख्यसागराला सदैव भरतीच येत गेली. पण आजपर्यंत एक महिन्याच्या आत त्याला पूर्ण ओहोटी लागेल...मरताना तुला तुझ्या पुत्राची मांडी मिळणार नाही. तू त्यांना पाहशील पण भेटू शकणार नाहीस...नि असाच तडफडत... तडफडत......." पुढे तो तपस्वी काय पुटपुटला ते राजाला कळलेही नाही. शवाला अग्नी देऊन राजा राजवाड्यात यायला निघाला. किर्र होते रान आणि शून्य झाले राजाचे मन.

□

काही दिवस गेले. राज्याचा कारभार पूर्ववत् चालू होता. पण राजाच्या मनात स्वास्थ्य नव्हते. आपल्या हातून घडलेल्या कृत्याबद्दल त्याला रात्रंदिवस हुरहूर लागून राहिली.

त्याच महिन्यातील एके दिवशी पहाटे राणीला प्रसूतिवेदना होऊ लागल्या व सायंकाळी दिवेलागणीच्या वेळी ती प्रसूत होऊन तिला मुलगी झाली. वाड्यात सगळीकडे आनंदीआनंद झाला. राजाने कुलगुरूला बोलाविले व मुलीचे भविष्य वर्तविण्यास सांगितले.

कुलगुरूने राजाला सांगितले : " राजा, सांगू नये ते सांगण्याची पाळी माझ्यावर आली आहे. राजकन्येचे ग्रह राजपुत्रांच्या ग्रहांशी पूर्ण वक्र आहेत. यापुढे राजपुत्र इथे राहिले तर कुळाचा नाश होईल. उद्‌ईक सूर्योदयापूर्वी या राजकन्येला तरी दूर केली पाहिजे किंवा राजपुत्रांना तरी अरण्यात पाठविले पाहिजे. " इकडे आड तिकडे विहीर अशी राजाची स्थिती झाली. वात्सल्यप्रेमाने त्याला काहीच करता येईना. मृत तपस्व्याचा शाप त्याला आठवला व तो अधिकच खिन्न झाला.

ही बातमी राजपुत्रांना समजली. वडिलांची व्यथा त्यांना जाणवली. धाकट्या बहिणीला दूर करण्यास आपण भाग पाडावे हे त्यांना लांछनास्पद व क्रूर कर्म वाटू लागले. म्हणून त्यांनीच राजवाडा सोडून जाण्याचा निर्धार केला.

मध्यरात्रीच्या सुमाराला कुणालाच थांगपत्ता लागू न देता ते उठले, व मातेच्या महालात गेले. सुगंधी दीप स्निग्धतेने तेवत होता. धवल वस्त्रे परिधान केलेली राणी मंचकावर स्वस्थ झोपली होती. ते प्रसन्न वातावरण व मातेचे सोज्वळ रूप पाहून त्या राजपुत्रांच्या हृदयाच्या तारा वियोगाच्या जाणिवेने छेडल्या गेल्या. पाणावलेल्या डोळ्यांनी त्यांनी मातेकडे पाहिले; नमस्कार केला व आले तसेच परतले. तेथून ते वडिलांच्या महालात गेले. राजा मंचकावर नव्हता. ते कावरेबावरे झाले. त्यांनी इकडे तिकडे पाहिले. ...राजा जमिनीवरच झोपी गेला होता....त्याच्या तेजस्वी मुखावर दुःखाच्या

म्लान छटा पसरल्या होत्या... हताश झाला होता राजा...दारुण होते त्याचे दुःख. राजा कसल्यातरी भयंकर स्वप्नसृष्टीत विहार करीत असावा. ...शांत जलाशयावर एकामागून एक तरंग उठावे त्याप्रमाणे त्याच्या मुखावर तरळते भाव येऊन जात होते. पुत्रप्रेमाने वडिलांचे मन कसे कुरतडले जात आहे ह्याची त्या राजपुत्रांना जाणीव झाली व भारावलेल्या हृदयाने त्यांनी वडिलांची चरणधूळ आपल्या मस्तकी धारण केली.

□

त्यांनी राजवाडा सोडला.

सात दिवसपर्यंत ते एकसारखे चालत होते. कंदमुळे खावी, झाडाखाली जरा विसावा घ्यावा नि पुन्हा चालू लागावे. सात दिवस नि सात रात्री अशा तऱ्हेने संपल्या. आठव्या दिवशी पहाटे ते एका सरोवराजवळ पोहोचले. फार मोठे सरोवर होते ते. जणू काय वनदेवतांचा आरसाच. प्रशांत सरोवराचे पाणी मात्र काळे काळे भोर. जणू एक विस्तीर्ण काळा दगडच. त्या सरोवराच्या मध्यभागी मोठमोठी कमळे फुलत होती. लाल, लाल रंग होता त्यांचा. त्या सरोवराच्या काळ्याभोर पार्श्वभूमिवर ती कमळे कितीतरी सुंदर दिसत होती. सरोवराच्या भोवती उंच उंच वृक्ष उभे होते. जणू काही निसर्गाच्या त्या संपत्तीचे ते रक्षकच. घनदाट होते ते अरण्य. सूर्योदय झाला की झालरीतून पाणी ओघळावे तसे कोवळे कोवळे सूर्यकिरण पानांफुलांच्या झरोक्यातून खाली शिरकत. वृक्षलतांच्या त्या हिरव्या अंगाखांद्यावर हसणारी, डुलणारी ती नानारंगी वनपुष्पे अतीव खुलून दिसत होती. शांत शांत होते ते वन. अधूनमधून निसर्गाचा एखादा भाट, एखादा पक्षी कूजन करी आणि त्याच्या मंजुळ आवाजाने, वनराईच्या त्या रूपसौंदर्यात नादमाधुर्याचीही भर पडे.

त्या राजपुत्रांनी ते दृश्य पाहिले. नंदनवनात पोचल्यासारखा त्यांना आनंद झाला. तिथेच पर्णकुटी बांधून राहण्याचे त्यांनी ठरविले.

दिवसामागून दिवस गेले. रात्रीमागून रात्री गेल्या. दिवसरात्रीचा पाठशिवणीचा खेळ चालू होता. मुनीवेशात नि संन्यस्तवृत्तीने राहाणाऱ्या त्या राजकुमारांना आपण राजपुत्र आहोत ह्याची आठवणही होईनाशी झाली.

□

राजपुत्र एकाएकी नाहीसे झाल्यामुळे राजाराणीने फार शोक केला, सगळी नगरी शोकाकुल झाली. प्रधानाने अष्टदिशांना दूत पाठविले. पण काही उपयोग झाला नाही.

राजकन्येचे अरुंधतीदेवी असे नाव ठेवण्यात आले.

अरुंधती आता मोठी झाली होती. रात्रीची कलिका पहाटेला अर्ध-विकसित होते; वाढत्या वयाबरोबर अरुंधतीचे सौंदर्यही विकसित होत होते.

पण त्या भरलेल्या, गजबजलेल्या राजवाड्यांत तिला कसली तरी उणीव भासे आणि त्या उणिवेने मनाला तीव्र चटका दिला की ती एक सुस्कारा सोडी. प्रधानांच्या अगर अमात्यांच्या घरी गेली की ही आपल्या भोवतालची उणीव तिला विशेष तीव्रतेने जाणवे.

प्रधानाला दोन मुलगे होते. अमात्यालाही तीन मुलगे होते. प्रधानाच्या अगर अमात्यांच्या मुली आपल्या बंधूंच्या धाडसाच्या, शौर्याच्या रसाळ गोष्टी अरुंधतीला सांगत. पण ती अशा गोष्टी त्यांना सांगू शकत नव्हती. बंधूंच्या उणिवेने तिचे बालिश मन दुःखीकष्टी होई.

मुलीमुलींच्या त्या चिमण्या जगात कधी कधी रुसण्याफुगण्याचे प्रसंग येत. आणि मग प्रधानाच्या व अमात्यांच्या मुली अरुंधतीच्या भावांचा उल्लेख करीत व तिचा पाणउतारा करण्याचा प्रयत्न करीत. असे काही घडले की ह्या प्रकाराचा खुलासा आईकडे करून घेण्याचा अरुंधती निश्चय करी. पण ती बाला राजवाड्यात आली की ते सर्व विसरत असे.

एक दिवस अशीच ती अमात्याच्या घरी गेली होती. अमात्यांच्या कुमारांनी हरिणाची शिकार करून आणली होती. अरुंधतीकडे पाहून अमात्यांच्या मुली म्हणाल्या—" राजकुमार इथे असते तर त्यांनी अशीच शिकार आणली असती, नाही ? " पण सहज बोललं गेलेलं ते वाक्य राजकुमारीच्या वर्मी लागलं. 'राजकुमार इथं असते' म्हणजे कुठं आहेत राजकुमार ? मला बंधू आहेत तर ?...तिचं मन ह्या एकाच विचाराभोवती फिरू लागलं. . आज मातेला विचारायचंच असं तिनं ठरविलं...आणि कुणाच्या नजरेला पडू न देता तिने हळूच पाठीवरील शेपट्याला एक गाठ मारून ठेविली.

घरी आल्यानंतर सायंकाळी दासी तिची पुन्हा केशरचना करू लागली. केस नीट करता करता दासीच्या हाताला ती गाठ लागली. गाठ सोडता सोडता तिने अरुंधतीला विचारले, " ही कशाला गाठ मारलीत तुम्ही, देवी ? "

अरुंधतीला आठवण झाली. तशीच ती उठली व धावत धावत राणीच्या महालात गेली. राणी मंचकावर बसली होती. खाली गालिचावर दासी वीणा वाजवीत होती.

करुण करुण होते ते स्वर त्या वीणेचे.

अरुंधती धावत धावत आत गेली व आईला बिलगली. मुलीला जवळ

घेऊन तिचे केस कुरवाळीत राणीने विचारले, " अशी का धावत आलीस, देवी ? "

मातेकडे पहात अरुंधतीने विचारले, मी काही विचारलं तर सांगशील ? अगदी खरं खरं सांगशील ?—"

राणीने देवीच्या उत्फुल्ल डोळ्यात न्याहाळीत फक्त स्मित केले.

" आई, मला किती भाऊ आहेत ? ते कुठे आहेत ? सांग ना ? सांग ना आई ? " तिच्या शब्दाशब्दातून उत्कटता प्रतीत होत होती.

राणीने तिच्याकडे पाहिले. डोळ्यांशी डोळे भिडताच तिला हुंदका अनावर झाला. ओक्साबोक्शी रडू लागली.

अखेर मुलीच्या आग्रहावरून तिला सगळी हकीकत सांगावी लागली.

ती गोष्ट ऐकताच आपली पूर्वकथा समजताच, अरुंधतीला फार फार वाईट वाटले. आपल्या बंधूंच्या गृहत्यागाला आपण कारणीभूत झालो याचे तिला मनस्वी वाईट वाटले.

सुन्न झाल्या तिच्या वृत्ती. बधिर झाली तिची गात्रे.

ती सायंकाळ आणि रात्र तिने विकल मन:स्थितीत काढली.

पण ज्या सत्याचे तिला आज दर्शन झाले, जो सत्यबोध तिच्या अजाण, भावविवश मनाला झाला, त्या सत्याकडे धाव घेतल्याशिवाय तिला रहावेनासे झाले.

मध्यरात्रीच्या सुमाराला ती उठली. माता-पित्याला तिने नमस्कार केला व ती राजवाड्याबाहेर पडली.

बाहेर अंधार दाटला होता. अष्टमीची आरक्त चंद्रकोर क्षितिजाला टेकली होती.

अरुंधतीने नमस्कार केला, " देवा ! आता तूच मला राख." अशी मनात प्रार्थना केली व झपाझप पावले टाकीत ती त्या अंधारात दिसेनाशी झाली.

□

कितीतरी दिवस ती सतत अरण्यातून मार्ग काढीत होती. घरट्यात आईच्या उबदार पंखाखाली विसावणाऱ्या पिलाला घरटे हेच जग वाटत त्याप्रमाणे असते. राजवाड्यासमोरील उद्यानापलीकडील जगाची अरुंधतीला कल्पना नव्हती.

आता तिचे पाय श्रमाने सुजले होते. सर्वांग काट्यांनी ओरबाडले होते. सर्वांग गलित झाले होते. श्रांत, श्रांत झाली होती ती. पण बंधूंना शोधून काढण्याचा तिचा उत्साह थोडासुद्धा कमी झाला नव्हता.

अरण्यात अधूनमधून तिला सिंहाची गर्जना ऐकू येई. वाघाची डरकाळी ऐकू येई. घुवडाचे घुत्कार ऐकू येत. पण ती भ्याली नाही. तिचा निश्चय ढळला नाही.

पोटातील भूक मागे परतवू शकली नाही. मृत्यूचे भय तिचा मार्ग रोखू शकले नाही, ती एकसारखी पुढे पुढे जात होती. आपण कुठे जातो हे तिचे तिलाच समजत नव्हते. पण कसली तरी एक दिव्य चेतना तिला पुढे खेचून नेत होती.

श्रमाने तिचा उमदा चेहरा लालबुंद झाला होता.

अकस्मात तिच्या दृष्टीसमोर ते विशाल सरोवर आले. काळे-काळेभोर पाणी आणि मोठी-मोठी, लाल-लाल कमळे. आनंद झाला तिला. क्षणभर विसावा घ्यावा म्हणून ती जागा पाहू लागली....तोच तिच्या कानी शब्द

आले—" मुली, ऐक. संन्यस्त मुनींचं हे तपोवन आहे. ह्या आश्रमाच्या आसपास, आमच्या दृष्टीच्या टापूत स्त्रीला पूर्ण मज्जाव आहे. इथं विसावा न घेता तू तुझ्या मार्गानं जा."

अरुंधतीनं वळून पाहिलं. तिच्या दृष्टीला एक सतेज ऋषिकुमार दिसला. आश्रमाबाहेर तो उभा होता. रुद्राक्षाची माळ त्याच्या हातात होती. त्याने वल्कले परिधान केली होती.

—त्याला पाहताच तिच्या अंतरंगात एक गोड, तरल, अस्पष्ट, संवेदना थरारली. ती त्या ऋषिकुमाराच्या अनुरोधाने चालू लागली.

पुन: त्या ऋषिकुमाराची साद तिच्या कानी आली.

" हे मुली, पुढे येण्याचा अविचार करू नकोस. हे तपोवन स्त्री जातीला वर्ज्य आहे. जा. मागे फीर. नाहीतर भस्मसात होऊन जाशील."

पण अरुंधती मागे फिरली नाही.

ती सरळ जाऊन त्याच्यापुढे उभी राहिली. त्याने विस्मित होऊन त्या धीट मुलीकडे पाहिले...त्याला एकदम आपल्या आईची आठवण झाली. आपल्या पूज्य आईची छोटी प्रतिमा आपल्यापुढे आहे की काय असे त्याला वाटले.

तिलाही आश्चर्य वाटले. आपल्या पूज्य पित्याची छोटी प्रतिमा आपल्या-पुढे आहे की काय असा तिला भास झाला.

तो विस्मित झाला. ती स्तिमित झाली.

त्या कुमाराने विचारले, 'मुली, तू कोण ? कुठं जातेस ? कुठून आलीस ? सारं सारं सांगशील ?'

अरुंधतीने आपली सगळी हकीकत सांगितली.

कुमाराने आपले डोळे पुसले. आकाशाच्या नीलिमेकडे नजर स्थिर करून तो विचार करू लागला. खालचा ओठ त्याने दाताखाली दाबून धरला. जणू त्याला आपले विचारही असेच दाबून धरायचे होते.

अरुंधती त्याच्याकडे टक लावून पहात होती. ती चटकन पुढे झाली. तिने त्याचा हात हातात धरला. तो गदगदा हलवीत कातर स्वराने तिने विचारले, "तुला माहीत आहेत, कुमार, तुला माहीत आहेत माझे भाऊ ?..."

कुमारने पुन्हा डोळे पुसले.

"मुली, तू तुझा टप्पा गाठलास; आम्हालाही आमचा टप्पा गाठला पाहिजे."

"काय म्हटलंस कुमार ?"

"तू तुझ्या बंधूंच्या आश्रमात आहेस. पण तुझे बंधू आता तुझे राहिलेले नाहीत. राजवाड्यातील मऊ शय्या त्यांना दगडाहूनही कठीण लागेल...मुली, तू जा." रुद्ध होता त्याचा स्वर.

"मी एकटी परत जाण्यासाठी आले नाही, भाऊ."

"मी तुला आश्रमात घेऊ शकत नाही. आश्रमाचे नियम मला तुझ्याशी जास्त वेळ बोलूही देत नाहीत. इतर बंधू येईपर्यंत तू दूर उभी रहा."

संध्याकाळी तिचे इतर सगळे बंधू आले. तिने सर्वांच्या भेटी घेतल्या.

तिच्या मोठ्या बंधूने तिला सांगितले, "आम्ही राजवाड्यात परत जाणं शक्य नाही. कारण आमचं जिणं हे आता आमचे राहिलेलं नाही. अखिल मानवांचं ते जिणं आहे. आमच्या महान् कार्यापुढे आम्हाला राजवाड्याची

पर्वा नाही. कोणतेच मायापाश आता आम्हाला बद्ध करू शकणार नाहीत."

"असलं कोणतं तुमचं महान् कार्य ? आत्मक्लेश, देहताडन हेच ना ?" अरुंधतीने विचारले.

"नाही. जीवनशुद्धी आणि जीवनविकास हे आमचं कार्य...ईश्वरानं निर्मिलेल्या या सृष्टीचा मानव पूरक आहे. पण मानव अजूनही विशुद्ध झालेला नाही. तो अजूनही हिंसक आहे. मानव श्रेष्ठ आहे. पण तो बंधुभाव जाणत नाही. हौसेसाठी, केवळ मजेसाठी दुसऱ्याचे रक्त सांड-ण्याची त्याला फार आवड आहे. आमचं वनवासी जीवन हे या हिंसक जीवनाचे फळ आहे. या हिंसक वृत्तीने माणूस पशू बनत चालला आहे. त्याला सुधारावं, बंधुभावाच्या एकजुटीने त्याला कार्यप्रवृत्त करावं म्हणून आम्ही तपश्चर्या करीत आहोत. हा आत्मनाश नव्हे, हा आत्मयज्ञ आहे."

ती रात्र अरुंधती आश्रमात राहिली. वडील भावाचे बोलणे तिला पटले पण रुचले नाही. त्यांची सेवा करीत तिथंच रहायचं तिने ठरविलं. तिला खात्री होती की कधीतरी आपल्या बंधूंचे मन वळेल व मग या वनवासी जिण्याला ते रामराम ठोकून राजवाड्याकडे वळतील.

बंधूंचे मन वळविण्याचा ती प्रयत्न करू लागली. प्रत्येक उगवत्या दिवसाने अरुंधतीला आशेची किरणं दाखवावी नि प्रत्येक मावळत्या दिवसाने तिला निराशेच्या अंधःकारात लोटून जावे, असे चालले होते. असेच काही दिवस गेले. आश्रमाची स्वच्छता, टापटीप कायम ठेवण्याचे काम अरुंधती करू लागली. आपल्या बंधूंची मने प्रसन्न ठेवून ती त्यांच्या कार्यात त्यांना मदत करू लागली.

आणि अखेर एके दिवशी पूर्वेकडील उगवत्या किरणांनी तिला खरोखरच आशा दाखविली.

प्रातःस्नानाला जाण्यासाठी अरुंधतीचे भाऊ तयार होते. आश्रमाबाहेर पडता पडता वडील भावाने तिला म्हटले— " देवी, आज आम्ही सर्व राजवाड्यात जायला निघू. पण ते एका अटीवर. आम्ही जायचं ते तिथं रहायला नव्हे, तर माता-पित्याला नमस्कार करून परत यायला. "

अरुंधतीने ते मान्य केले. तिचा आनंद गगनात मावेनासा झाला.

बंधू स्नानाला निघून गेल्यानंतर ती आश्रमाबाहेर पडली.

पहाटेची वेळ होती ती. गार वारा सुटला होता. आकाशीचे तारे निस्तेज दिसत होते. पूर्वेकडे जरासे उजळल्यासारखे झाले होते.

अरुंधती भिरभिर सर्व तपोवन फिरली. तिच्या हृदयात तिचा आनंद सामावत नव्हता. तिला वाटले देहाची बंधने तोडून हवेत मिसळून गेले तर काय बहार होईल ! स्वैरपणे गाता येईल ! मुक्तपणे फिरता येईल ! ! ती गाऊ लागली. हसू लागली. नाचू लागली. बागडू लागली. तरी आनंदानं दुथडी वहाणारं तिचं मन रितं झालं नाही.

ती पुन्हा आश्रमाकडे वळली.

सूर्योदय झाला होता.

तिची नजर सरोवराकडे वळली. काळेभोर पाणी चकाकत होते आणि त्या सरोवरामध्ये मोठी मोठी कमळे अर्धविकसित झाली होती. त्यांच्याकडे नजर जाताच ती उभी राहिली.

वारा मंद मंद वाहत होता.

कमळे नाचत होती, डुलत होती.

अरुंधती ती कमळे पाहून मोहवश झाली. तिला वाटले, ती कमळे आपणाला बोलावीत आहेत, खुणावीत आहेत. तिने त्यांच्याकडे टक लावली. हो ! अगदी खरंच ! तिला वाटलं, ती नाचणारी, डुलणारी लालबुंद कमळे खरंच आपणाला बोलावीत आहेत, खुणावीत आहेत.

अनेक वेळा असली कमळे त्या सरोवरात फुललेली तिने पाहिली होती, पण आजच्यासारखे कधीच त्यांनी तिला भारले नव्हते, मोहिले नव्हते. कसली ही जादू ?

तिने ती कमळे मोजली.

एक...दोन...तीन ...सात कमळे होती ती.

एकदम तिला एक विचार सुचला. "हो ! असंच करायचं ! ही सात कमळं माझ्या सात बंधूंना द्यायची ! त्यांच्या काळ्या काळ्या जट-भारांवर मुकुटासारखी शोभतील ही ! वनवासी राजकुमारांना वनराणीने दिलेले हे मुकुट..." ह्या विचारानं तिच्या मनाची पकड घेतली.

हसत, खदखदा हसत, मनमोकळेपणी हसत, ती पाण्यात उतरली.

तिचे लांब, सरळ केस तिच्यामागे नाचत होते. तिचे डोळे त्या कमळांवर स्थिर झाले होते.

पाणी कापीत ती त्या कमळांजवळ पोचली. ती सातही कमळे तिने आपल्या नाजूक बोटांनी खुडली.

ती आश्रमात पोचली. आणि तेवढ्यात तिचे सातही बंधू स्नान आटोपून आले.

सर्वांनी प्रवासाची तयारी केली.

धूत वस्त्रे परिधान केली.

अरुंधतीने आश्रमाच्या दारात प्रत्येकाच्या हातात एकएक कमळ दिले.

भगिनीनं दिलेली भेट ! त्यांनी आनंदानं तिचा स्वीकार केला.

किती टपोरी होती ती कमळे. सहज त्यांनी ती वर उचलली. वास घेण्यासाठी म्हणून नव्हे पण नाकाजवळ नेली आणि तेवढ्यात—

आपण पहातो ते स्वप्न की काय असे अरुंधतीला वाटले. ते सातही बंधू सात पक्षी होऊन उडून गेले....दूर अंतरिक्षात दिसेनासे झाले.

पण ते स्वप्न नव्हते. तो उगवता सूर्य, ते काळेभोर पाणी, तो आश्रम, ती सात कमळे तिला जागृतीची जाणीव देऊ लागली.

तिच्या शोकाला सीमा राहिली नाही.

रडून रडून तिचे डोळे सुजले.

सात दिवसपर्यंत ती तेथेच बसून राहिली.

डोळ्यांतून अश्रुधारा वहात होत्या. मुखातून कुलदेवाचे नामस्मरण चाललेले होते.

सातव्या दिवशी पहाटेला तेथे एक साधू आला.

" मुली, रडत्येस ? " त्याने विचारले.

अरुंधतीने सगळी हकीकत त्याला सांगितली.

साधू म्हणाला, " मुली, मनात विश्वास धर की घडत आहे ते सर्व तुझ्या कल्याणासाठीच घडत आहे. तुझे बंधू तुला परत मिळतील. सात वर्षांनी ते परत येतील. मात्र ते नाहीसे झाल्याचे तू कुणास सांगता कामा नये. ते परत येईपर्यंत तू मौन पाळलं पाहिजे. "

साधूने तिला एक मंत्र सांगितला. त्या मंत्राचा जप करीत ती त्या अरण्यात एकटीच राहू लागली.

बाल वाङ्मय विभाग.
बा. क्र. ....२९५.... दिनांक ......
किशोर क्र. २५६

□

सहा वर्षे अशा तऱ्हेने संपली.

आणि एके दिवशी एक विचित्र प्रकार घडला.

काही शिकारी त्या अरण्यात शिकारीला आले होते. त्यांनी अरुंधतीला पाहिले. साधू-वृत्तीने रहाणाऱ्या त्या तरुण मुलीचे त्यांना फार कौतुक वाटले.

ते शिकारी राजाच्या मर्जीतील सरदार होते. त्यांनी ठरविलं की या मुलीला नेऊन राजवाड्यात ठेवावी. म्हणजे राणीचा वेळ हिच्या सहवासात चांगला जाईल.

त्यांनी अरुंधतीला आपल्या बरोबर नेले.

दैवावर भार ठेवून अरुंधती त्यांच्याबरोबर गेली.

राजवाड्यात जाताच तिने सर्वांना ओळखलं. फार वर्षांनी आली होती ती. पण तिला कोणीच ओळखू शकले नाही. वनवासी राहणीने तिला पूर्ण बदलून टाकले होते.

आणि ती काही आता पूर्वीची बाला राहिली नव्हती.

अनेकांनी तिला अनेक प्रश्न विचारले. पण तिने कुणालाच उत्तर दिले नाही.

उत्तर देणे तिला शक्य नव्हते. कारण तिने मौनव्रत धारण केले होते. राणीने तिला अनेक प्रश्न केले. ती कोण, कुठची, वनात काय करीत

होती, असे अनेक प्रश्न केले. पण आपुलकीने कुणी असे प्रश्न केले की तिला रडू येई. नीलकमळासारखे दिसणारे तिचे टपोरे डोळे, दवबिंदूंनी भिजल्यासारखे आसवांनी भरून येत. आणि मग तिच्या म्लान चेहऱ्याकडे पाहून राणीला दुःख होई.

अरुंधतीचे मौनव्रत चालू होतं. सात वर्षे पूर्ण व्हायला थोड्या दिवसांचा अवधी राहिला होता.

एके दिवशी सायंकाळी ती बागेत बसली होती. समोर सुंदर तलाव होता. तलावात शुभ्र कमळे फुलली होती.

त्या तलावाच्या पायरीवर बसावं, टपोऱ्या शुभ्र कमळांकडे एकसारखं पहावं हाच एक तिच्या उद्विग्न मनाला नाद लागला होता.

तशीच ती त्या पायरीवर बसली होती. त्या शुभ्र कमळांकडे पहात होती.

—त्यांच्याकडे पहाता पहाता तिला अरण्यातीलं लाल कमळांची आठवण झाली.

आणि मग आपल्या बंधूंच्या ताटातुटीचा प्रसंग तिला आठवला.

फार फार वाईट वाटले तिला.

कुठेतरी बसून मनसोक्त रडावे असे तिला वाटले.

इतक्यात तलावातील त्या संथ पाण्यात पक्ष्यांच्या काही पडछाया तिला दिसल्या. तिनं वर पाहिले.

सात सुंदर पक्षी आकाशातून खाली येत होते.

त्यांचे पंख हिरवे होते.

चोच लाल होती.

अंग पांढरे होते.

ते पक्षी खाली आले. अरुंधतीच्या भोवती ते नाचू लागले. उडू लागले. बागडू लागले.

त्यांची किलबिल ऐकून अरुंधतीचे मन प्रसन्न झाले.

त्या बागेत पुष्कळ पक्षी होते. पण असले सुंदर, गोजिरवाणे पक्षी तिने कधीच पाहिले नव्हते.

त्या पक्ष्यांच्या रम्य क्रीडा पाहून तिच्या मनात हळूच विचार आला.

—"पक्ष्यांच्या रूपानं हे राजपुत्रच तर परतले नसतील ना ?"

तिच्या हृदयात आशेचा दीप पेटला.

आनंदाने तिचे सर्वांग फुलल्यासारखे झाले.

पुष्कळ वर्षांनी ती पहिल्यांदाच मनमोकळेपणी हसली.

दररोज सायंकाळी ते सात पक्षी राजवाड्यात येऊ लागले. अरुंधती-भोवती नाचू लागले. उडू लागले. किलबिल करू लागले.

सर्वांना तो एक गमतीचा विषय बनला.

एक दिवस बातमी आली—शेजारच्या शत्रूराष्ट्राने त्या राज्यावर स्वारी केली होती.

अरुंधतीला आठवलं—की ते सात पक्षी राजवाड्यात आले होते त्याच दिवशी शत्रूचा हल्ला आला होता.

दर दिवशी सायंकाळी मावळत्या दिशेकडून ते राजवाड्यात येऊ लागले. सकाळी जाऊ लागले.

दर दिवशी सरहद्दीवरून पराभवाच्या बातम्या येऊ लागल्या.

शहरामागून शहरे शत्रूने घेतली.

सेनापती लढाईत मारला गेला.

हजारो सैनिक कामी आले.

अखेर राजाने लढाईवर जायचे ठरविले. राजा लढाईवर गेला पण चार दिवसानीच प्राणांतिक जखमांनी जर्जर होऊन परत आला.

□

राजा महालात होता. शय्येवर तळमळत होता. औषधोपचार चालू होते.

अरुंधती पायाशी बसून होती.

राजा निचेष्ट पडला होता. त्याची शेवटची घटिका जवळ येत होती.

सूर्यबिंब टेकडीआड जात होते.

नगराबाहेरील लढाईचा कोलाहल अस्पष्ट ऐकू येत होता.

ते सात पक्षी आले व झाडावर बसले.

समोरील खिडकीतून राजाला ते दिसले.

त्याला वाटलं की त्या पक्ष्यांना धरावं. त्यांच्या नाजूक पंखांवरून हात फिरवावा. त्यांची मंजुळ किलबिल मनसोक्त ऐकावी.

त्यांना धरण्यासाठी त्याने हात वर केला. पण तो मंचकावरच राहिला.

त्यांना धरण्याचा हुकूम राजाने दिला. पण ते हुकूमाचे शब्द मुखातून सुटले नाहीत.

त्यांना डोळे भरून पहावे असे राजाला वाटले. पण ते पक्षी अस्पष्ट, अस्पष्ट दिसू लागले. कसल्यातरी दाट धुक्यात ते अदृश्य झाले.

राजाची गात्रे अचेतन झाली. त्याचा प्राण निघून गेला.

राणी सती गेली.

शत्रूने राजवाड्याला वेढा घातला.

एवढे मोठे राज्य पण चुटकीसरशी रसातळाला गेले. एवढे मोठे वीर पण सहज रणांगणात बळी पडले.

प्रधानाला वाटले अरुंधतीच याला कारण. तिचा इतिहास कुणा-लाच माहीत नव्हता. ही वेडगळ मुकी मुलगी राजवाड्यात आली तेव्हा-पासून राजघराण्याच्या नाशास सुरुवात झाली. प्रधानाच्या मनाने घेतले की, मोठा यज्ञ करावा. त्या दुर्लक्षणी मुलीचा रणदेवतेला बळी द्यावा. म्हणजे गेलेले राज्य परत मिळेल. गेलेले राजपुत्र परत येतील. सर्व सुरळीत होईल.

दुसऱ्या दिवशी यज्ञाची तयारी केली.

अरुंतीला सचैल स्नान घातले.

तिला शुभ्र वस्त्र नेसविले.

तिच्या गळ्यात फुलांच्या माळा घातल्या.

कपाळावर मळमट भरला.

तिला आणून यज्ञाजवळ उभी केली.

समोर अग्नि पेटत होता. लाल-पिवळ्या ज्वाला स्वैरपणे नाचत होत्या.

अरुंधतीला वाटले, ते यज्ञकुंड म्हणजे सर्वग्रासी कृतांताचा जबडा ! त्या ज्वाला म्हणजे कृतांताच्या जिभा !

ती भ्याली नव्हती. असे निष्फळ मरून जाणे तिला आवडत नव्हते.

आहुतीची वेळ जवळ आली. सर्वांच्या चेहऱ्यावर उत्सुकता दिसू लागली.

समोरच्या तेजोराशीला अरुंधतीने नमस्कार केला.

तिच्या मनात आलं " किती वेडे आहेत हे मानव. रक्त सांडण्याची,

रक्त पाहण्याची काय ही यांना हौस. आपण काय करीत आहो हेच यांना कळत नाही."

मंत्राचा घोष चालू होता. आहुतीची वेळ जवळ आली होती.

एवढ्यात सात पक्षी उडत उडत तिथं आले. आल्याबरोबर त्यांनी एकच किलबिलाट करण्यास सुरुवात केली. जणू त्यांना म्हणावयाचं होतं: "हे काय चालवलं आहे तुम्ही? हे क्रूर कर्म बंद करा."

लोकांना त्या पक्ष्यांचा त्रास होऊ लागला. त्या सातही पक्ष्यांना पकडण्यांत आले. त्यांना बागेत सोडण्यात आले. पुन: ते येऊन किलबिलाट करू लागले. इकडेतिकडे उडू लागले. लोकांना त्रास देऊ लागले. अखेर त्यांना पकडून त्याच यज्ञकुंडात टाकण्याचा हुकूम प्रधानाने दिला.

प्रत्येक ब्राह्मणाने एकेका पक्ष्याला धरले.

अरुंधतीने पाहिले,—त्या पक्ष्यांच्या जागी मुनिवेषातील आपले बंधू आहेत असा तिला भास झाला. तिला असेही वाटले की ते म्हणत आहेत: "घाबरू नकोस. मानव नाशवंत आहे. शस्त्रधारी मानव शस्त्राला बळी पडतो. पण भस्मीभूत मानवच अमर होऊ शकतो. शस्त्राने विध्वंस होतो. शांतीने उद्धार होतो. जिवंत रहाण्याने नसले तरी आमच्या बलिदानाने तरी आमचं कार्य पूर्ण होऊ दे."

क्षणमात्र दिसला तो भास.

पण तो भास नव्हता. ते सत्य होते. ते सात पक्षी म्हणजे मुनिवेषधारी राजकुमार होते. पण त्यांना प्रकट व्हायला थोडा अवकाश होता.

आवाहन संपताच सर्वांनी एकच जयघोष केला. पक्ष्यांची आहुती आधी देण्याचं ठरलं.

अरुंधती शांत होती.

सातही पक्ष्यांना बरोबरच कुंडात टाकण्यात आले......काय चमत्कार ?

त्या धगधगत्या, प्रखर ज्वालेत सात सतेज ऋषिकुमार उभे राहिले. सर्वांग पेटत असतानाही ते हसत होते, शांत होते.

क्षणमात्र अरुंधती दचकली. पण दुसऱ्याच क्षणी तिने अग्निकुंडात उडी घेतली.

त्या प्रचंड ज्वालांनी सर्वांना एकजीव केले.

त्याच दिवशी शत्रूंनी राजवाडा जमीनदोस्त केला.

नरबलीची चाल त्या राज्यात बंद झाली.

आणि आकाशाच्या भांडारात आठ नक्षत्रांची भर पडली.

सात नक्षत्रांच्या पुंजक्याला आम्ही सप्तर्षि म्हणतो व थोड्याच अंतरावर सप्तर्षींची बहीण अरुंधती आपल्या उज्ज्वल चारित्र्याचा स्निग्ध प्रकाश पाजळीत असताना दिसते.

* *

# देवदूत

फार फार वर्षांपूर्वीची ही गोष्ट. फार दूरच्या एका देशात एक राजा राज्य करीत होता. त्याला एक मुलगा होता. राजपुत्र सात वर्षांचा असतानाच राजा वारला. राजपुत्र लहान असल्यामुळे प्रधान राज्यकारभार करू लागला.

राजपुत्र फार सालस आणि पापभीरु होता. पण दरबारातील सर्व लोक, सरदार, दिवाण, प्रधान, सगळे अतिशय स्वार्थी आणि दुष्ट होते.

प्रधानाच्या हातात कारभार येताच त्याने मनात येईल तसे वागण्याचे ठरविले. राजपुत्रही सदाचारापासून दूर असावा म्हणून त्याची खटपट सुरू झाली. त्याने राजपुत्रासाठी एक सुंदर राजवाडा बांधला. त्या वाड्याच्या भोवती सुंदर बगीचे उभे केले. त्या बगीच्यात रंगीबेरंगी फुले, मोठमोठी तळी आणि अनेक पक्षी होते. ते बगीचे म्हणजे एक रम्य स्वप्न वाटे. पक्षी तेथे गात असत, फुले फुलत असत आणि नर्तिका नाचत असत.

राजपुत्राला इच्छा होईल ते मिळण्याची तेथे व्यवस्था केली होती.

पण राजपुत्राचे मन तिथे रमत नव्हते. त्याला विलास नको होता. त्या राजवाड्याभोवती एक मोठा तट होता. त्या तटाबाहेर काय आहे, तेथील लोक आपल्यासारखेच आहेत का, तिथे असेच पक्षी गात असतात का, अशाच नर्तिका नाचत असतात का, अशीच फुले फुलत असतात का, हे पहावे असे त्याला वाटे. पण त्याला बाहेर कोणी सोडीत नसे. प्रधानाचा तसाच सक्त हुकूम होता.

अशीच काही वर्षे गेली व वाढत्या वयाबरोबर बाहेरचे स्वतंत्र जग पहाण्याची राजपुत्राची इच्छाही वाढीस लागली.

एक दिवस राजपुत्र बागेत बसला होता. पक्षी मंजुळ गात होते. फुलांचा सौम्य सुवास हवेत दरवळत होता व संगीताच्या सुरेल तानावर नर्तिका नाचत होत्या.

तो पौर्णिमेचा दिवस होता.

नृत्य ऐन रंगात आले होते. राजपुत्र डोळे भरून ते पहात होता. त्याचे कान संगीताने भारले होते. इतक्यात—

—कुणीतरी तटाबाहेरून एक अति करुण अशी हाक मारली. राजपुत्राने ती हाक ऐकली. ती हाक त्याच्या काळजात खोलवर रुतली व जखमी मृगाप्रमाणे तो धावतच दरवाजाकडे गेला. पण तो दरवाजा बंद होता. तो उघडण्याचे बळ राजपुत्रात नव्हते.

पण त्या दिवसापासून राजपुत्र झुरत गेला. त्याचे गुलाबी गाल फिकट व निस्तेज दिसू लागले. प्राजक्ताच्या देठासारखे लालसर नाजूक असणारे त्याचे ओठ वाळून गेले. हिऱ्यासारखे चमकणारे त्याचे डोळे शिंपल्यासारखे भावशून्य दिसू लागले.

पौर्णिमेनंतर चंद्रकला कमी होत गेल्या व अमावास्येच्या दिवशी तटाबाहेरील जगाप्रमाणे तो राजवाडाही भीषण काळोखात बुडून गेला.

राजपुत्र वारला.

पण मृत्युपूर्वी एक मजेशीर प्रसंग घडला.

त्या अल्पवयी राजपुत्राचे प्राण नेण्यासाठी एक देवदूत आला होता.

राजपुत्राचे डोळे मिटत होते. त्याची जीभ आत ओढली जात होती. गात्रे गलित झाली होती. त्याच्या मिटत्या डोळ्यांना तो देवदूत दिसला.

त्या देवदूताची कांति पौर्णिमेच्या चांदण्यासारखी होती.

त्याचे अंग गुलाबाच्या पाकळीसारखे नाजूक होते.

कमळाच्या कळीसारखे त्याचे डोळे होते.

व पक्ष्याच्या पंखासारखे त्याला दोन पंख होते.

असा तो देवदूत जवळ येताच, राजपुत्र त्याला म्हणाला—" माझी एक इच्छा अपुरी राहिली आहे. तू कर ना ती पूर्ण. कर ना."

देवदूत म्हणाला, " मी करीन तुझी इच्छा पूर्ण. हा जीर्ण देह तू पुन्हा मागणार नसलास तर मी करीन तुझी इच्छा पूर्ण."

राजपुत्र म्हणाला : " देवदूता, या बंदिवासात माझं आयुष्य गेलं. बाहेरचं स्वतंत्र जग पहाण्याची मला मोठी इच्छा आहे रे. कर ना ती पूर्ण. कर ना..." त्याला मोठा हुंदका आला. देवदूत जवळ उभा आहे हे कुणालाच दिसत नव्हते. राजपुत्राचा हुंदका पाहून नोकरांना वाटले, त्याला फार यातना होत आहेत.

देवदूताने उत्तर दिले : " राजपुत्रा, बाहेरच्या मोकळ्या जगात दोन दिवस मनसोक्त वावरण्याची मी तुला मोकळीक देतो. आठ दिवस संपताच तुला माझ्याबरोबर यावे लागेल."

राजपुत्राला आनंद झाला. गडद अंधारात प्रकाशाची एक तिरीप येऊन जावी तशी त्याच्या चेहऱ्यावरून हर्षाची एक छटा येऊन गेली. नोकरांना वाटले, " राजपुत्राची ही शेवटची घटिका आहे. दिवा असाच विझवताना मोठा होतो. "

आणि खरोखर ती राजपुत्राची शेवटची घटिका होती.

राजपुत्राचा अंत्यविधी केल्यानंतर प्रधानाने ठरविले की, राजपुत्राचा एक मोठा पुतळा करावा. राजधानीच्या मध्यभागी एक उंच खांब बांधण्यात आला व त्या खांबावर राजपुत्राच्या पुतळ्याची स्थापना करण्यात आली.



उंच उंच होता तो खांब. त्या खांबावर कुणी उभा राहिला असता तर त्याला त्या विस्तीर्ण नगरीचा सगळा भाग दिसला असता.

अतिशय सुंदर होता तो पुतळा. शुभ्र पाषाणाचा केला होता तो. त्याचे कपडे सोन्याच्या पानांनी मढविले होते. त्याच्या डोळ्यांच्या जागी दोन टपोरे नील घातले होते आणि तलवारीच्या मुठीवर एक माणिक चमकत होते.

त्या खांबावर त्या पुतळ्याची स्थापना होताच देवदूताने आपले वचन पूर्ण केले. तो पुतळा सजीव झाला. त्या निळ्या डोळ्यातून तो पाहू लागला. तलवारीच्या मुठीवर त्याने ऐटीने हात ठेविला.

बाहेरचा रम्य देखावा पाहून त्याला फार आनंद झाला. त्याचा चेहरा अधिकच प्रसन्न दिसू लागला. लोक म्हणू लागले—" किती सुंदर आहे हा पुतळा ! "

दिवसभर राजपुत्र दगडी पुतळ्यासारखा उभा राही व चोरपावलाने रात्र नगरीत शिरताच राजपुत्र मनमोकळेपणाने नगरीकडे नजर फेकी.

पहिल्या दिवशी रात्री आकाशात तारकांची गर्दी झाल्याबरोबर राजपुत्राने मुक्ततेचा श्वास सोडला.

या एका दिवसात राजपुत्राने पुष्कळ पाहिले, पुष्कळ ऐकिले, पुष्कळ अनुभविले आणि त्याने जे काही पाहिले त्याने त्याच्या डोळ्यात अश्रू उभे केले.

त्याच्या पायाजवळ देवदूत बसला होता.

अकस्मात देवदूताच्या अंगावर एक थेंब पडला. त्याला नवल वाटले की आकाशात एकही ढग नसता पाऊस कसा पडावा ?...थोडा वेळ जाताच आणखी एक थेंब त्याच्या अंगावर पडला. त्याने वर पाहिले आणि त्याना फार आश्चर्य वाटले.

राजपुत्राचे डोळे आसवांनी भरले होते; त्याच्या शुभ्र गालांवरून आसवे ओघळत होती.

चंद्राच्या पिवळ्या प्रकाशात आसवांनी डबडबलेले राजपुत्राचे नील डोळे अशा काही तऱ्हेने चकाकत होते की देवदूताला गहिंवरून आले.

" तू का रडतोस ? " त्याने राजपुत्राला विचारले.

" दूता, मी पाहतो ते स्वप्न की सत्य ह्याची मला भ्रांती पडते. मी राजवाड्यात होतो तेव्हा अश्रू म्हणजे काय, ह्याची मला कल्पनाही नव्हती. बागेत फिरावं, तळ्यात पोहावं, पक्ष्यांशी बोलावं, पुष्पांशी हसावं, नर्तिकाबरोबर नाचावं असं होतं माझं जिणं. मी कुरूपता पाहिली नव्हती. दारिद्र्य अनुभविलं नव्हतं. रडू ऐकलं नव्हतं. "

" मग राजपुत्रा, आता तू कुठे पाहिलेस हे सर्व ? "

" दूता, समोर पहा. अरुंद गल्लीत उजव्या बाजूला एक लहानसं घर आहे. त्या घराची एक खिडकी उघडी आहे. त्या उघड्या खिडकीतून आत पहा...एक स्त्री जमिनीवर बसून शिवणकाम करीत आहे. त्या शिवणकामावरच ती उपजीविका करीत असावी. किती कृश आहे ती स्त्री ! किती फिक्कट आहे तिचा चेहरा. तिच्या हाताकडे पहा. वारंवार सुया बोचून तिच्या बोटांच्या झालरी झाल्या आहेत....विधवा आहे ती स्त्री. कुणाचाच आधार नाही तिला....

" त्या खोलीच्या कोनाड्यात पहा ......फाटक्या वाकळ्यावर एक लहान मूल झोपलेलं आहे. आजारी आहे ते मूल. तापाने फणफणत आहे ते. तहानेने त्याचा घसा कोरडा झाला आहे. पण त्याचा घसा ओला करण्यास घरात पाण्याशिवाय काही नाही. ते मूल कण्हत आहे व ती

माता रडत आहे. तिचे अश्रू पुसायला मी जाऊ शकत नाही. दूता, माझे अंग दगडाचे आहे रे."

"आम्ही काही करू शकत नाही. आपल्या कर्माची फळे ती भोगत आहे."

"दूता, दूता, तू माझे एक काम करशील का?......बघ, ते मूल कण्हत आहे व ती स्त्री रडत आहे."

"मी काय करावं असं तुला वाटतं?" देवदूताने विचारले.

"माझ्या तलवारीच्या मुठीवर माणिक आहे. ते माणिक काढ नि त्या गरीब स्त्रीच्या पदरात घाल.

राजपुत्राच्या डोळ्यातून आणखी दोन अश्रू पाझरले. देवदूताने पाहिले. की, राजपुत्राचा चेहरा अतिशय दुःखी होता. त्याला त्याची कीव आली. तो म्हणाला—"मी करीन तुझी कामगिरी."

त्याने ते लाल माणिक काढून घेतले, आपले चिमुकले पंख हवेत पसरले व तो उडाला.

तो त्या घराजवळ आला. उघडया खिडकीतून त्याने आत पाहिले. आतील कंदील मालवला होता. चंद्रकिरण त्या खोलीत विखुरले होते. ती विधवा स्त्री उघडया जमिनीवर निजली होती. तो आजारी मुलगा तसाच कण्हत होता.

देवदूत हळूच आत गेला. त्याने ते माणिक त्या स्त्रीच्या डोक्याजवळ ठेवले.

तसाच तो त्या आजारी मुलाजवळ गेला. थोडे पाणी त्याच्या तोंडात घातले. फाटक्या गोधडीवर बसून, आपल्या पंखाने त्याने त्याला वारा घालण्यास सुरवात केली.

त्या मुलाला आराम वाटला असावा. कारण त्याने आई समजून देव-दूताचा हात आपल्या हातात घेतला व म्हटले, "आई, किती छान वाटतं मला. मी आता बरा होईन, नाही? तू कित्ती, कित्ती चांगली आहेस ग आई?" फार क्षीण होता त्याचा आवाज.

देवदूताने एक निःश्वास सोडला. आपले पंख फडफडावीत तो तिथेच बसून राहिला.

त्या मुलाला गाढ झोप लागताच देवदूत तेथून उठला.

तो राजपुत्राजवळ आला तेव्हा पहाटेचा गार वारा वाहू लागला होता

सूर्याची कोवळी किरणे त्या नगरीवर पडताच लोकांच्या रहदारीला ऊत आला.

राजपुत्र पुन्हा स्तब्ध उभा राहिला.

चंद्रोदय होताच देवदूत राजपुत्राला म्हणाला: "राजपुत्रा, तुझी मुदत संपली आहे. आज मध्यरात्रीच्या सुमाराला वायूवर स्वार होऊन चंद्रकिरणांच्या प्रकाशात आपण देवाघरी गेलं पाहिजे."

ते ऐकताच राजपुत्राचा चेहरा उतरला. तो म्हणाला :

"दूता, दूता, देवदूता, आजची एक रात्र तू मला राहू देणार नाहीस का?"

"वर देवाघरी आमची मार्गप्रतिक्षा चालली आहे. हे असंख्य तारे मला खुणावीत आहेत. मला माझं कर्तव्यकर्म केलं पाहिजे. आज तू माझ्या-बरोबर आलं पाहिजेस..."

"दूता, दूता, देवदूता, नगरीच्या मध्यभागी जरा नजर फेक रे. श्रीमंत लोकांच्या हवेल्या आहेत तिथे. त्यातील त्या हिरव्या हवेलीकडे पहा. कान लावून ऐक. गोड गोड संगीत ऐकू येईल तुला. पैंजणांचा मंजुळ

झंकार मोह पाडील तुला ...आत जाऊन पहा ...त्या हिरव्या बंगलीच्या त्या हिरव्या महालात हिरवे दीप तेवत आहेत. हिरव्या साड्या नेसलेल्या नर्तिका तिथे नृत्य करीत आहेत. किती बेहोष झाले आहेत ते लोक ! दारूच्या बाटल्या फस्त होत आहेत....त्या महालाबाहेर कोण आहे पहा. मऊमऊ बिछान्यावर मालकाचे आवडीचे श्वान बसले आहे व पक्वान्नावर ताव मारीत आहे..."

"हो. मला ऐकू येते ते संगीत. मला दिसतं ते नृत्य."

त्या हवेलीच्या आवारात कोण आहे पहा. माणसाचा आकार असलेले कितीतरी प्राणी जमा झाले आहेत. ते काही नृत्य पहायला आलेले नाहीत. पहा त्यांच्या कपड्यांकडे. त्यांचा मूळ रंग कोणता हे सांगू शकशील का तू ? पहा त्यांच्या शरीराकडे. हाडाशिवाय काय दिसतं तुला ? पहा त्यांच्या चर्येकडे. अधाशीपणाशिवाय, दारुण निराशेशिवाय आणखी काही दिसतं का तुला ?"

"मी आजची एक रात्र तुझ्याबरोबर राहीन. दुसरे एखादे माणिक मी त्यांना नेऊन देऊ का ?"

"माझ्याकडे आणखी माणिक नाही. मी माझ्या खजिन्याचा मालक असताना माझी ही दुबळी प्रजा मी पाहू शकलो नाही....माझ्या अंगावर सोन्याचे पत्रे आहेत. ते काढ आणि त्या गरीब बांधवांच्या ओंजळीत टाक."

देवदूताने ते सोन्याचे पत्रे काढले आणि एक भरारी मारून तो त्या हिरव्या बंगलीकडे गेला.

नृत्य ऐन रंगात आले होते. संगीताची लय साधली होती.

बाहेर भिकारी ओरडत होते—'गरिबांवर दया करा, सरकार.'

सुरेल संगीत ऐन रंगात आले असता सतारीची तार तुटावी तशी त्या ओरडण्याने नृत्याची मजा बेरंग होऊ लागली. त्या भिकाऱ्यांना हाकलून लावण्यासाठी कुत्र्याना मोकळे सोडण्यात आले...

सर्व भिकारी घाबरले. ते सैरावैरा पळू लागले. म्हातारे होते ते अडखळून, कोलमडून पडले.लहान बालक होते ते पायाखाली चेंगरले गेले.

त्याच्या त्या दुर्दशेकडे पाहून बंगलीतले लोक फिदीफिदी हसू लागले.

देवदूताने ते सर्व पाहिले व त्याने आपले डोळे पुसले.

त्या धावणाऱ्या, पळणाऱ्या भिकाऱ्यांच्या पदरात त्याने एक एक सोन्याचे पान टाकून दिले.

भिकारी स्तिमित झाले. आनंदाने त्यांचे डोळे भरून आले. आकाशाकडे डोळे लावून त्यांनी ईश्वराचे आभार मानले.

त्यांची ती कृतज्ञ बुद्धि पाहून देवदूताला आनंद झाला.

पहाटेला चंद्र निस्तेज होताच तो पुन्हा राजपुत्राजवळ आला.

सकाळी सूर्य उगवताच सूर्यकिरणांनी लोकांना जागे केले.

राजपुत्र पुन्हा दगडासारखा उभा राहिला.

पण त्या पुतळ्यावरचे सोन्याचे पत्रे कुणी चोरले असावे याविषयी लोकात तर्कवितर्क सुरू झाले. चोरांना पकडण्याविषयी प्रधानाने नगरात दवंडी पिटवली.

ती दवंडी ऐकून तो पुतळा खदखदून हसला.

□

रात्री मेघांच्या फटीतून चंद्राने पृथ्वीकडे डोकावून पाहताच देवदूत राजपुत्राना म्हणाला : “ आमची जाण्याची वेळ जवळ आली. ”

राजपुत्राला वाईट वाटले.

देवदूत म्हणाला, " राजकुमारा, तुझी जाण्याची वेळ झाली. वायूवर स्वार होऊन चंद्रकिरणांच्या प्रकाशात तू देवलोकी आलं पाहिजेस. "

राजपुत्र काकुळतीने म्हणाला, " दूता, दूता, देवदूता, आजची एक रात्र तू मला इथं ठेवणार नाहीस का ? "

आकाशात मेघांचा गडगडाट नि विजांचा कडकडाट चालू झाला.

देवदूत म्हणाला, राजपुत्रा, वरती पहा. मी इथं थांबल्याबद्दल देवांचा संताप अनावर झाला आहे. चाबकाचे फटकारे मारून ते मला हुकूम करताहेत की लवकर देवलोकी ये. "

राजपुत्र म्हणाला—" देवदूता, वादळात सापडलेल्या त्या लहान मुलीकडे जरा नजर फेक रे. तिच्या फाटक्या कपड्यातून वारा दांडगाईने आत घुसत आहे. त्याने तिच्या कपड्यांच्या चिंध्या केल्या आहेत. ती पावसाने भिजत आहे. थंडीने गारठत आहे. तिचे सर्वांग थरथर कापत आहे. तिच्या हातातील साबणाच्या वड्या गटारात पडल्या आहेत ...ती अतिशय गरीब मुलगी आहे. तिच्या घरीदारी दारिद्र्य उभे आहे. विकायला आणलेल्या त्या वड्या गटारात पडल्या म्हणून ती रडत आहे. त्या वड्या विकल्या असत्या तर तिला थोडे पैसे मिळाले असते. ते पैसे घेऊन ती आपल्या वडिलांकडे गेली असती. "

" अरेरे ! गरीब बिचारी. " देवदूत उद्गारला.

शहराबाहेरील त्या झोपडीकडे पहा. झोपडीच्या छपरातून आत पाणी पाझरत आहे. दारात एक म्हातारा बसला आहे. त्याची दृष्टी गेली आहे. दृष्टीने अधू नि पायाने पंगू असा तो म्हातारा एकतारीवर भजन करीत आहे. पण दमल्यामुळे त्याच्या कंठातून शब्द बाहेर नीट उमटत नाहीत.

मुलीला येण्यास उशीर झाला म्हणून त्याचा जीव कासावीस होत आहे. मुलीला श्रम पडत आहेत म्हणून त्याच्या डोळ्यांतून अश्रूंची झरी वहात आहे व बापास अन्न नेण्यास पैसा नाही म्हणून इकडे ही मुलगी रडत आहे. त्यांचं दुःख तू दूर नाही का करणार ? ”

मी आजची रात्र तुझ्याबरोबर इथं राहीन. पण मी त्यांचं दुःख कसे निवारण करू ? ”

“ माझ्याकडे आता काही शिल्लक राहिलं नाही. पण माझ्या डोळ्याच्या बुबुळांच्या ठिकाणी दुर्मिळ असे नीळ आहेत. माझ्या उजव्या डोळ्यातील नीळ काढ व तो त्या मुलीच्या ओटीत टाक. ”

“ मी तुझे प्राण हरण केले तरी मी तुझा शत्रू नव्हे. हे कसले क्रूर काम मला तू सांगितलेस ? मी हे करू शकत नाही, राजपुत्रा. ”

“ दूता, दूता, देवदूता, अरे नाही म्हणू नकोस. त्या बापलेकीच्या दुःखाने माझे काळीज वितळू पहात आहे. मी सांगतो तसे कर. ”

देवदूताचा नाईलाज झाला. त्याने हळूच राजपुत्राचा डोळा काढला व बाहेरच्या वाढत्या वादळात भरारी मारली. तो त्या मुलीजवळ पोचताच तिच्या तळहातावर त्याने तो नीळ ठेवला.

“ किती सुंदर आहे हा मणी ! ” ती म्हणाली. ती हसली व धावत धावत आपल्या घरी गेली.

दुसऱ्या दिवशी सूर्यास्त होताच देवदूत म्हणाला—“ आज काही झालं तरी मी राहू शकत नाही. राजपुत्रा, वायूवर स्वार होऊन, चंद्र-किरणांच्या प्रकाशात आज तू देवलोकाचं महाद्वार गाठलं पाहिजे. ”

पण राजपुत्राचे लक्ष देवदूताच्या बोलण्याकडे नव्हते. त्याची दृष्टी दूरचे एक दृश्य न्याहाळीत होती. तो व्याकूळ होऊन म्हणाला—“ दूता,

दूता, देवदूता, त्या तिकडे पुलाखाली पहा. पुलाच्या खांबाखाली दोन मुले बसली आहेत. हवेत गारठा आहे. पाऊस पडत आहे व ती मुले उघडी आहेत. भुकेमुळे त्यांचे पोट पाठीला चिकटले आहे. त्यांच्या हातात एक भाकरीचा तुकडा आहे. ती काळीभोर भाकरी दगडाहूनही कठीण आहे. पंधरा दिवसापूर्वी ती तयार केली गेली असेल. पावसाच्या पाण्यात भिजवून ती भाकरी ते खात आहेत...पण त्यातील लहान मुलगा तुकडा काढता येत नाही म्हणून रडत आहे व तो मोठा मुलगा त्याला भरवीत आहे. दूता, जरा पहा ना त्याच्याकडे..."

"राजपुत्रा, आम्ही असे पहात राहिलो तर युगेच्या युगे पुरायची नाहीत."

"पहा, ते त्या पुलाखाली झोपताहेत. थंडीने त्यांचे अंग कापत आहे. दात वाजत आहेत. ऊब मिळावी म्हणून ते एकमेकाला मिठी मारून झोपत आहेत....पहा, पहा, दूता, त्या गरीब मुलांना तिथं झोपताही येत नाही. कारण पोलीस शिपाई त्यांना हाकलून लावीत आहे."

"तू सांगशील ते मी करीन. पण मी तुझा डोळा काढू शकणार नाही. तू पूर्ण आंधळा होशील मग."

"दूता, दूता, देवदूता, काढ तू माझा डोळा. उघड्या डोळ्यांनी या क्रूर जगाकडे माझ्याने पहावत नाही. माझे डोळे नेहमी सौंदर्य पहात आले. पण आता मला सौंदर्य कुठेच दिसत नाही. दूता, काढ तू माझा डोळा."

देवदूताने राजपुत्राचा दुसरा डोळा काढला. तो काढताना देवदूताच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या.

एकाच भरारीने देवदूत पुलाजवळ आला. थंडीत कुडकुडणाऱ्या त्या मुलांच्या हातात त्याने तो नीळ टाकला. त्यांच्या हसऱ्या चेहऱ्याकडे पहात पहात देवदूत पुन: राजपुत्राजवळ आला.

" राजपुत्रा, आता तू आलंच पाहिजेस माझ्याबरोबर. वायू मदत करीत आहे. चंद्र मार्ग दाखवीत आहे. तारे डोळे मिचकावून मला माझ्या कर्तव्याची जाणीव देत आहेत. . . . . .राजपुत्रा, आता विलंब करता उपयोगी नाही. "

" दूता, आज मी तुझ्याबरोबर यायला तयार आहे . . .पण ह्या नगरीचे बंध माझ्याने तोडवत नाहीत. दूता, देवदूता, मी आता काही पाहू शकत नाही. पण ह्या नगरीतील बेसूर संगीत मी ऐकू शकतो. दुरून, शहराबाहेर कसले तरी आवाज मला अस्पष्ट ऐकू येत आहेत. ते कसले आवाज आहेत, हे पाहून येशील दूता . . .? "

देवदूताने आपले गोजिरवाणे पंख पसरले व हवेत झेप मारली. पक्ष्याच्या भरारीने तो शहरावरून उडत गेला.

मध्यरात्रीच्या शीतल वायूबरोबर तो परत आला.

तो परत येताच राजपुत्राने विचारले—

" दूता, तू काय पाहिलंस ते मला सगळं सगळं सांग. "

" नगराच्या मागच्या बाजूला मोठमोठे कारखाने आहेत. दिवसरात्र तेथे काम चालू आहे. "

" कसलं काम चालू आहे तेथे ? सांग दूता, सांग. मला सगळं सांग." राजपुत्र उत्सुकतेने म्हणाला.

" तिथं मोठमोठी शस्त्रं करताहेत. "

" शस्त्र करताहेत ? कशासाठी दूता ? दुबळ्यांचं रक्षण करण्यासाठी ?"

" तू अगदी भोळा कसा रे झालास ? जगात दुर्बल फार, सबल कमी. जास्तीत जास्ती दुर्बलांना थोड्यात थोड्या वेळात ठार करण्यासाठी ही शस्त्रे तयार करण्यात येत आहेत. अशा तऱ्हेने ठार केल्यानंतर दुर्बलांची मालमत्ता सबलांना मिळणार आहे. येता येता मी आणखी एक दृश्य पाहिलं ..." बोलता बोलता देवदूत थांबला. जे काही पाहिलं ते बोलून दाखवू नये असं त्याला वाटलं. पण त्यामुळेच राजपुत्राची उत्सुकता वाढली. तो म्हणाला—

" दूता, दूता, देवदूता, तू का थांबलास ? माझ्या शून्य दृष्टीपुढील मानवांचं चित्र भीषण, भयाण होत आहे म्हणून थांबलास ? बोल दूता, बोल. हे हृदय-विदारक चित्र पुरे करून टाक. माझे हृदय दुभंगत आहे. अंतःकरण तीळतीळ तुटत आहे; पण ती अघोर बातमी ऐकल्याशिवाय माझ्याने राहवत नाही."

" ऐकायची तुझी इच्छा असेल तर तुझं नाजूक हृदय घट्ट करून ऐक. तिथल्या एका कारखान्यातील मजुरांनी काम करण्याचे नाकारले. आणि काम करण्याचे नाकारले म्हणून त्या लोकांना काठ्यांनी झोडपण्यात आले. राजकुमारा, मी चार माणसांना बेशुद्ध पडलेले पाहिले. त्यात एक स्त्री होती. तिच्या कपाळाला खोक पडली होती. तिच्यातून रक्त वहात होते....राजपुत्रा, एक भुकेलेलं कुत्रं तिथे घिरट्या घालीत होते...ती स्त्री मृत आहे असे त्याला वाटले असावे. तिच्या देहात आपले तीक्ष्ण दात खुपसायला ते तयार झाले होते...माझ्याने तिथे राहवले नाही ..."

—पण देवदूताचे बोलणे अर्ध्यावरच राहिले. कारण ती करुण कहाणी ऐकून राजपुत्राचे अंतःकरण दुभंगून गेले—

त्या पुतळ्याचे दोन तुकडे झाले.

त्याचा काळजाचा तुकडा देवदूताच्या पायाजवळ पडला.

देवदूताने त्या पुतळ्याला नमस्कार केला.

त्याने तो काळजाचा तुकडा उचलून घेतला.

बेफाम वायूवर स्वार होऊन त्याने स्वर्गाची वाट धरली.

चंद्राच्या रुपेरी किरणांनी त्याचा मार्ग उज्ज्वल केला.

अति उंच जाताच त्याने एकदा वळून खाली पाहिले. खाली अंधार दाटला होता; व नगरीतल्या हवेल्यांतील दिवे काजव्यांसारखे लुकलुकत होते. पुतळ्याचा उंच खांब अस्पष्ट दिसत होता.

तो खांब दिसताच दूताने एक निःश्वास सोडला.

ढगांच्या विरल वातावरणातून देवदूत वर गेला. जिथूनतिथून तारकांचे पुंज त्याला खुणावीत होते. प्रत्येकाला त्याच्या हातातील ती वस्तु पहाण्याची उत्सुकता होती.

देवद्वारी पोचताच देवाने दूताला प्रश्न केला—

" राजपुत्राचे प्राण आणण्यास तू इतका विलंब का लावलास ? "

दूताने नम्रतेने उत्तर दिले : " मी राजपुत्राचे प्राण आणले आहेत. पण मृत्यूलोकातील एक दुर्मिळ वस्तु आपणाला भेट आणण्यासाठी मी थांबलो. "

" कसली भेट ? कसली वस्तु ? " देवाने सस्मित विचारले.

— दूताने पुतळ्याचा काळजाचा तुकडा देवाच्या पायाशी ठेवला.

देव हसला. देवाने त्याला स्पर्श करताच त्याचा एक सुंदर, गोंडस बालक झाला व तो दुडुदुडु धावत गेला.

देव म्हणाला, " हा बालक माझ्या नंदनवनात सदैव खेळत राहील.

कुरूपता त्याला दिसणार नाही.
रडू त्याला ऐकू येणार नाही.
दारिद्र्य तो उपभोगणार नाही.
ते ऐकून देवदूताला आनंद झाला.
बालकाच्या पायातील वाळ्यांचा रुणझुणु नाद मंद मंद होत गेला.

* *

# भारती

डोंगरावरील माळरानात भारती रहात होती.

प्रात:काळ झाला की ती उठत असे. नदीत स्नान करीत असे. धूत वस्त्रे पेहरून सूर्याला नमस्कार करीत असे.

तिला सहा मुलगे होते. तिच्या प्रार्थनेच्या सुरात तेही आपले सूर मिळवीत असत.

प्रार्थना संपताच तिचे मोठे मुलगे गुरे घेऊन माळावर जात असत. कोणी शिकार शोधीत असत व लहान मुलगे आश्रमात रहात असत.

भारती त्यांना धनुर्विद्या शिकवीत असे. राजनीतीचे पाठ देत असे.

भारती त्या मुलांची माता होती आणि गुरुही होती.

भारती आणि ती मुले सुखात कालक्रमणा करीत होती.

—पण तो प्रदेश त्या मुलांच्या कार्यक्षेत्राला अपुरा होता. कारण तो प्रदेश धनधान्याने समृद्ध नव्हता. त्या नापिक प्रदेशात राहून राजचिन्हे धारण करण्याची आशा भारतीच्या मुलांना नव्हती.

वाढत्या वयाबरोबर त्या मुलांच्या अंगात जोम वाढला. अफाट क्षितिजापलीकडे दडलेली साहसे पहाण्याची त्यांची उत्सुकता वाढली.

एके दिवशी उगवत्या सूर्याची प्रार्थना संपताच भारतीचे तीन पुत्र मातेजवळ गेले व म्हणाले : "माताजी, तू आम्हाला धनुर्विद्या शिकविलीस, राजनीतीचे पाठ दिलेस, आम्हाला समर्थ केलेस. त्या सामर्थ्याचा उपयोग करण्याची आम्हाला इच्छा आहे. माताजी, आम्ही उद्या दिग्विजयास जाणार आहोत. तुझ्यासाठी राज्य जिंकून येणार आहोत. आशीर्वाद दे माताजी."

आपले पुत्र कधीतरी आपणापासून दूर जाणार आहेत, हे भारतीला ठाऊक होते. पण वियोगाचा क्षण :जवळ येताच त्या मातेचे हृदय हळहळले. तिने काहीच उत्तर दिले नाही. ती उगी राहिली.

त्या दिवशी तिच्या मनाला स्वास्थ्य मिळाले नाही. दुसऱ्या दिवशी पुत्रांना निरोप द्यावा की देऊ नये ह्याचा तिच्या मनात ठाम निश्चय होईना.

धनुर्विद्येकडे तिचे लक्ष लागेना.

राजनीतीत तिचे चित्त रमेना.

सूत काढण्याकडेही तिचे मन गुंतेना.

ती उठली व बाहेर येऊन बसली. फार मोठे होते ते झाड. दाट सावली पडली होती जमिनीवर. भारती तिथे बसली. जवळच तिचे पुत्र धनुर्विद्येची तालीम घेत होते. त्यांच्याकडे पाहून तिला त्यांचा अभिमान वाटला.

झाडावर पक्ष्यांनी मंजुळ चिवचिवाट केला म्हणून तिने वरती पाहिले. एक पक्षीण घरट्यात आपल्या पिलांना भरवीत होती. लहान होती ती

पिले. त्यांना अजून पुरते उडताही येत नव्हते. भारतीने पाहिले, ती पक्षीण पिलांच्या चोचीत चोच घालून त्यांना भरवीत होती.

सहज भारतीने बाजूला पाहिले. त्या झाडाच्या मोठमोठ्या फांद्यावर कितीतरी घरटी होती. पण ती सर्व रिकामी होती. त्यातील पिले पक्षी होऊन दूर उडून गेली होती. त्यांना आईच्या उबदार पंखांची गरज नव्हती.

भारतीने ते पाहिले; व तिच्या सूज्ञ मनाने त्यातील आशय जाणला.

दुसऱ्या दिवशी भारतीने आपल्या तिन्ही पुत्रांना निरोप दिला.

प्रातःकाळी सर्वांनी नदीत आंघोळ केली. शुभ्र वस्त्रे घातली व सर्व प्रार्थनेला बसले.

भारतीने प्रार्थना म्हणण्यास सुरवात केली. खोल, धीरगंभीर होता तिचा स्वर !

प्रार्थना संपताच सर्वांनी कंदमुळांचा फराळ केला.

भारतीचे तीन पुत्र मातेजवळ गेले व त्यांनी तिला लवून नमस्कार केला. " चिरंजीव व्हा ", मातेने आशिर्वाद दिला.

सूर्यबिंब डोंगरामागून वर सरत होते.

भारतीचे तीन पुत्र प्रवासाला निघाले होते.

त्यांच्या अंगात धवल वस्त्रे होती.

त्यांच्या पाठीवर बाणाचा भाता होता.

हातात धनुष्य होते.

त्यांचे लांब, कुरळे केस वाऱ्याबरोबर पाठीवर उडत होते.

आश्रमाच्या दारात उभी राहून भारती त्यांच्याकडे पहात होती. ते दूर दूर जात होते. ते क्षितिजाच्यामागे दिसेनासे होताच भारतीच्या

डोळ्यातून दोन उष्ण अश्रुबिंदू गालावर ओघळले. तिने आपल्या तीन लहान मुलांना प्रेमाने जवळ ओढले.

वर्षामागून वर्षे गेली. त्या तिन्ही पुत्रांची काहीच बातमी भारतीला समजली नाही. आश्रमात राहिलेली तिन्ही मुले आता मोठी झाली होती.

एक दिवस सायंप्रार्थनेनंतर ती तिन्ही मुले तिला म्हणाली : " माताजी, तू आम्हाला विद्या शिकविलीस, शक्ती दिलीस आणि शक्ती व विद्या योग्य तऱ्हेने वापरण्यास नीती शिकविलीस. पण आमच्या या सामर्थ्याचा उपयोग कुठे करावा ते मात्र दाखवून दिले नाहीस....माताजी, रानवट हरिणांना मारण्यासाठीच का आम्ही धनुर्विद्या शिकलो ? वृक्षावर चढण्यासाठीच का आम्ही बाहुबल कमावलं ? गाई वळविण्यासाठीच का आम्ही राजनीती शिकलो ? आमच्या गुणाचे योग्य चीज होण्यासाठी आम्हाला परवानगी दे, माताजी. "

पुत्राची ही विनंती ऐकताच भारतीच्या हृदयाला धक्का बसला. आपले तीन पुत्र आपणाला दुरावले तसे हेही दुरावतील अशी तिला भीती वाटली.

तिला माहीत होते की आपण त्यांना कायमचे घरात डांबून ठेवू शकणार नाही. पंख फुटले की पिले घरट्यात राहणार नाहीत. तिला हेही माहीत होते की नदीच्या तुफान पाण्याला कोणी बांध घालू शकत नाही. ध्येयाकडे धावणाऱ्या प्रमत्त तरुणांनाही कोणीच अडवू शकत नाही. म्हणूनच तिने मुलांना उत्तर दिले, " बाळांनो, तुम्ही जिथे जाल तिथे मी तुमच्याबरोबर येईन. "

दुसऱ्या दिवशी पहाटेला भारती आपल्या तिन्ही मुलासह प्रवासास

निघाली. येणाऱ्या भाग्याची तिला आशा होती व येणाऱ्या संकटांची तिला भीतिही होती.

आश्रम सोडून जाताना तिला फार फार वाईट वाटले.

प्रवासात चालत असताना कितीतरी सूर्योदय नि सूर्यास्त तिने पाहिले.

वर्षेच्या वर्षे मागे लोटली. ती सर्व दक्षिण दिशेला जात होती.



आणि एके दिवशी ती एका भव्य पर्वताजवळ पोचली.

अतिशय उंच होता तो पर्वत. घनदाट अरण्याने झाकलेला होता तो. त्याच्याकडे पाहिले की कुणाच्याही छातीत धडकी भरत असे.

भारतीला वाटले की, त्या पर्वतावर चढू नये. कोणती संकटं पुढं

येतील कुणास ठाऊक. पण तिचे मुलगे ते ऐकेनात. त्यांच्या धाडसी स्वभावाला ते रुचेना.

अखेर सर्वांनी तो पर्वत चढण्यास सुरुवात केली.

जसजसे वर जावे तसतसा तो पर्वत भयानक स्वरूप धारण करू लागला. अनेक हिंस्र श्वापदांशी त्यांना लढावे लागले. अनेक वादळी वाऱ्यांशी त्यांना तोंड द्यावे लागले.

कितीतरी महिने ते एकसारखे पर्वत चढत होते.

पुष्कळ वर चढल्यानंतर त्यांना पर्वताची शुभ्र शिखरे दिसू लागली. जणू काही कुणी वृद्ध तपस्वी पर्वताचे रूप घेऊन ध्यानस्थ बसला होता.

हवा अतिशय गार होती. पाणी कुठेच दिसत नव्हते. सगळीकडे बर्फच बर्फ दिसत होते.

अखेर त्यांनी तो पर्वत ओलांडला.

—आणि पर्वत ओलांडताच रम्य, स्वप्नमय भूमी त्यांच्या दृष्टीला पडली.

पाचूची अफाट शेते वाऱ्यावर हलत होती. डुलत होती.

पाच नदीचा कलकल नाद गोड संगीत घुमवीत होता.

भारतीच्या आनंदाला भरती आली. अनेक वर्षांचे क्लेश दूर झाले असे तिला वाटले.

त्या सर्वांनी नदीत स्नान केले. किती गार होते ते पाणी !

स्नान आटोपल्यानंतर त्यांनी सूर्याची आराधना केली

उगवत्या सूर्याची कोवळी किरणे हिरव्या शेताशी खेळू लागली.

भारतीने ते पाहिले. तिला वाटले किती प्रसन्नतेने ही भूमी हसत आहे! कशी उदारपणे आमचे स्वागत करीत आहे!

पाच नद्यांच्या त्या प्रदेशात भारती तिच्या तीन पुत्रांसह राहू लागली.

पण थोड्याच दिवसात त्यांना समजलं की या प्रांतात रहायचं असेल तर सदैव धनुष्याला बाण लावून ठेविला पाहिजे.

कारण ती भूमी निर्मनुष्य नव्हती. तिथे लोक रहात होते.

त्यांचा वर्ण काळा होता. त्यांचे ओठ जाड होते. ते फार उंच नव्हते.

दगडांना आणि वृक्षांना ते भजत असत.

त्यांच्याशी युद्ध करण्यास भारतीचे पुत्र तयार झाले. "माताजी, तू आमची गुरु. आज तू आमची परीक्षक हो. तू शिकविलेल्या धनुर्विद्येत आम्ही पास होतो की नाही ते पहा." ते म्हणाले.

"बाळांनो, त्यांच्याशी वैर साधू नका. शिक्षेपेक्षा क्षमा श्रेष्ठ आहे. जे दुबळे आहेत त्यांना क्षमा करा. भूमि विश्वजननी आहे. सर्व मानवाची ती माता आहे. तुमचा इथं राहण्याचा हक्क जे मानणार नाहीत त्यांचा तुम्ही पराभव करा. पण वैर साधू नका. तुम्ही त्यांच्यात मिसळू नका. पण त्यांना तुमच्यांत सामावून घ्या." भारतीने सांगितले.

भारतीचे तिन्ही पुत्र युद्धाला तयार झाले. कितीतरी वर्षे ते युद्ध चालू होते. शत्रुपक्षाचा पराभव होत होता.

आणि त्या विराट पर्वतावर बसून भारती शांतिगीते गात होती.

त्या गीताचे स्वर अखिल भारतात घुमू लागले. अखिल भारताला त्यांनी एकजीव केले.

युद्ध संपले. सगळे मित्र झाले.

सगळा राज्यकारभार भारतीच्या हाती आला.

भारती सुखाने राज्यकारभार करू लागली. तिचे तिन्ही पुत्र आनंदात दिवस कंठू लागले. धान्याने कोठारे भरली. सुवर्णाने खजिने भरले. सुख-संपत्ती राजवाड्यात नांदू लागली.

—मग एके दिवशी एक बातमी आली. बातमी ऐकून भारतीच्या पुत्रांना राग आला.

राज्याच्या उत्तरेकडच्या तटाचा दरवाजा कुणीतरी ठोठावू लागला. तटाच्या रक्षकाने विचारले, " कोण आहे ? "

" दरवाजा उघडा. आम्हाला तुमच्या संपत्तीचे वाटेकरी व्हायचे आहे. " बाहेरून उत्तर आले.

भारतीचे पुत्र युद्धाला तयार झाले. आपल्या तलवारी, धनुष्यबाण त्यांनी सज्ज केले.

भारतीला ही बातमी समजली. ती म्हणाली, " बाळांनो, अविचार करू नका. ही भूमी विश्वजननी आहे. आमचा दरवाजा कुणासाठीही बंद असता कामा नये. कुणाला आमच्या संपत्तीचा वाटेकरी व्हायचं आहे ते मी पाहून येते. "

भारती तटाजवळ गेली. तिने प्रेमळपणाने विचारले, " कोण आहे ?"

" दार उघडा, दार. आम्हाला तुमच्या संपत्तीचे वाटेकरी व्हायचे आहे. " बाहेरून उत्तर आले.

तो आवाज भारतीला ओळखीचा वाटला. ती तटावर चढली. तिने खाली पाहिले. खाली एक धिप्पाड पुरुष घोड्यावर स्वार होता. त्याच्या अंगात तुमान होती. डोक्यास टोपी होती व टोपीवर फेटा बांधला होता. याच्या मिशा कल्लेदार होत्या व दाढी भरीव होती.

भारतीने त्याच्याकडे टक लावून पाहिले. पहाता पहाता त्या धिप्पाड पुरुषाच्या जागी तिला एका तरुण युवकाची मूर्ति दिसली. धवल वस्त्रे घातली आहेत, पाठीला बाणाचा भाता बांधला आहे, हातात धनुष्य धरले आहे व तिला वाटले की तो तरुण म्हणत आहे—"माताजी, तू आम्हाला धनुर्विद्या शिकविलीस, राजनीतीचे पाठ दिलेस, तू दिलेल्या सामर्थ्याचा उपयोग करण्यास आम्ही जातो, आशीर्वाद दे. माताजी."

पण त्या तरुणांत व ह्या धिप्पाड पुरुषात कितीतरी फरक होता. ह्याचा पोशाख वेगळा होता. ह्याची भाषाही निराळी होती.

—पण राजवाड्यात परत जाताना भारती स्वतःशी म्हणाली, "भाषा आणि पोशाख हे वरवरचे भेद आहेत. ह्या माणसाच्या देहात माझंच रक्त खेळत आहे. हा माझा मुलगा आहे."

तिने आपल्या मुलांना सांगितले, "बाळांनो, मी पुनः सांगते, अविचार करू नका. तटाबाहेर उभा असलेला हा तरुण तुमचाच भाऊ आहे. तुमच्या संपत्तीचा त्याला वाटेकरी होऊ द्या."

पण तिच्या पुत्रांना तिचे बोलणे रुचले नाही.

त्यांचे लक्ष वेषावर होते.

त्यांचे लक्ष भाषेवर होते.

आणि या भेदामुळेच ते एकजीव होऊ शकले नाहीत. भारतीच्या शांतिगीतांचा काहीच उपयोग झाला नाही.

घनघोर युद्ध झाले. तरुण विजयी झाला.

पण त्याला सर्व राज्य जिंकता आले नाही. राज्याच्या उत्तरेकडच्या भागावर त्याने आपली सत्ता स्थापन केली.

वरून शांत दिसणाऱ्या समुद्राच्या पोटात खळबळ चालू असते, वरून शांत दिसणारा अग्नि आतून धुमसत असतो. सुखाने राज्य करीत असताना भारतीच्या चारही पुत्रांच्या मनात द्वेषाग्नि पेटत होता.

अशीच आणखी काही वर्षे गेली.

एक दिवस बातमी आली की राज्याच्या पश्चिम तटाचा दरवाजा कुणीतरी ठोठावीत आहे.

भारती गडबडीने गेली व तिने विचारले, " कोण आहे ? "

" एक दुर्दैवी प्रवासी आश्रयाची याचना करीत आहे. "

भारतीला तो आवाज परिचयाचा वाटला. ती तटावर चढली. तिने खाली पाहिले. खाली एक दमला-भागलेला वाटसरू उभा होता. समुद्राच्या प्रवासाने तो फार शिणलेला होता.

त्याचा वेष निराळा होता.

त्याची भाषाही निराळी होती.

त्याने तिला ओळखले नाही.

पण तिने त्याला ओळखले.

राजवाड्याकडे परत जाताना ती स्वतःशीच म्हणाली, " देश तशी भाषा. कुठल्या देशाहून आला आहे बिचारा कुणास ठाऊक. पण माझे मन मला सांगत आहे की हा माझाच मुलगा आहे. माझेच रक्त त्याच्या देहात खेळत आहे. "

तिने आपल्या तिन्ही मुलांशी वाटाघाट केली व त्या प्रवाशाला आसरा दिला.

भारतीला आनंद झाला. तिला फार फार आनंद झाला. कारण तिचे

पाच पुत्र तिच्याजवळ होते. चार पुत्र राज्यकारभार चालवीत होते व एक त्यांच्या आश्रयाला होता.

पण कधी कधी तिला दुःख होई. आपले मुलगे असे वेगवेगळे रहात आहेत म्हणून तिला खेद होई. ते एकमेकांना पाण्यात पहात असत म्हणून ती चिंता करी.

त्या बंधुबंधूमध्ये द्वेष धुमसत होता.

भारतीजवळ राजवाडयात तिघे पुत्र रहात होते.

त्यातील एक म्हणाला : " माताजी, मी माझ्या बंधूकडे जातो. समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करतो."

तो गेला व भारतीला अंतरला.

कारण समेट करण्याच्या नादात त्याने वेगळाच पंथ धरला.

भारतीचे तत्त्वज्ञान पण बंधूची तामसवृत्ति त्याने स्वीकारली.

आपल्या बंधूसारखी त्याने दाढी ठेविली.

व तो भारतीपासून दूर राहू लागला.

भारतीला फार वाईट वाटले. तिला सहा पुत्र होते. पण तिचे दोनच पुत्र तिच्याजवळ राहू लागले. तीन पुत्र विभक्त झाले. सहाव्या पुत्राचा ठावठिकाणा नव्हता.

अखेर तो सहावा पुत्र तिला शोधीत आला.

पश्चिमेच्या तटाचा दरवाजा त्याने ठोठावला.

" कोण आहे ? " तटाच्या रक्षकाने विचारले.

" दूर देशचा एक व्यापारी व्यापारासाठी आला आहे."

दरवाजा उघडण्यात आला. व्यापारी आत आला.

त्याच्या पायात तुमान होती. अंगात कोट होता. डोक्याला साहेबी टोपी होती.

त्याचा रंग तांबूस पिवळा होता. त्याचे केस पिंगट होते.

त्याचे डोळे घारे होते.

भारतीने त्याला ओळखले. पण तो भारतीला ओळखू शकला नाही.

" बाळा, कुठून आलास तू ? " मातेने विचारले.

" बाळ! तू मला बाळ म्हणतेस ? तू माझी आई नव्हेस." तो म्हणाला.

भारती हसली. तिने पुन: विचारले,

" तू खराच अज्ञानी आहेस. बाळ कुठे आहे रे तुझी आई ? "

" माझी आई दूर, फार दूर, हजारो मैल दूर आहे. "

" तू मला शोधीत इथे नाही आलास ? "

" तुला शोधीत आलो. "

" का ? मला शोधीत हजारो मैलांचा प्रवास का केलास ? " भारतीने उत्सुकतेने विचारले.

" तुझी संपत्ती माझ्या मातेच्या चरणाशी नेऊन ओतण्यासाठी मी आलो आहे. "

भारतीला वाटले, किती वेडगळ आहे हा !

पण तो व्यापारी वेडगळ नव्हता !

सरळ स्वभावाच्या भारतीला व्यापाराची कपटनीती माहीत नव्हती.

भारतीचे दोन पुत्र मातेजवळ राजवाड्यात रहात होते.

व्यापाऱ्याच्या लाघवी भाषणाला, मोहाला भारतीचा एक सुपुत्र बळी पडला.

त्याने आपली भाषा टाकून दिली.

त्याने आपला वेष टाकून दिला.

त्याने आपला धर्म सोडून दिला.

तो व्यापाऱ्याला फितूर झाला.

भारतीचे सगळे पुत्र तिला अंतरले होते. ते एकमेकांस विसरले होते.

व्यापाऱ्याची कारस्थाने सुरू झाले.

भारतीच्या पाचही पुत्रात कलह सुरू झाले.

तिची शांतिगीत कुणीच ऐकेनासे झाले.

ते स्वार्थी बनले. स्वार्थापलीकडे त्यांना काहीच दिसेनासे झाले. भारतीने शिकविलेली युद्धकला त्यांना अवगत होती. पण तिने शिकविलेली राजनीती; युद्धनीती, समाजशास्त्र ते पार विसरले होते.

भारतीचे पाचही पुत्र आपआपसात लढू लागले.

रक्ताचे पाट वाहू लागले.

भारतीला ते असह्य झाले. ती गेली आणि त्या प्रचंड पर्वतावर बसून शांतिगीते गाऊ लागली. नद्यांच्या कलकल सुरात तिने आपले सूर मिळविले.

नद्या समुद्राला मिळाल्या पण भारतीची शांतिगीते तिच्या पुत्रांच्या हृदयांत शिरली नाहीत.

शेवटी जे व्हायचे तेच झाले. भारतीचे सम्राटपद त्या आगंतुक व्यापाऱ्याकडे गेले. तागडी धरून आलेल्या त्या इसमाच्या हातात भारतीच्या हातातील राजदंड गेला. भारतीची संपत्ती गलबते भरून दूरदेशी नेण्यात आली.

तिच्या डोक्यावर मुकुट राहिला नाही.

तिच्या अंगावर भूषणे राहिली नाहीत.

तिच्या देहावर उंची वस्त्र उरले नाही.

राजवाडा सोडून तिला झोपडीत रहावे लागले.

उंची वस्त्र सोडून तिला फाटके वस्त्र नेसावे लागले.

मोत्यांचा वर्षाव करणाऱ्या तिच्या हातांना काटक्या गोळा कराव्या लागल्या.

रडून रडून तिचे डोळे सुजले. पूर्वी तिच्यापासून दुःख दूर होत. आता सौख्य तिच्यापासून दूर राहिले. पूर्वी तिच्या डोळ्यातून गळणाऱ्या अश्रूच्या एका थेंबासाठी रक्ताचे पाट वाहविण्यास तलवारी उपसून तिचे पुत्र तयार होते. आता ते हतबल झाले होते.

—मध्यरात्रीचा समय होता. वातावरण शांत होते. पण भारतीला झोप नव्हती.

आपल्या आश्रमात बसून ती करुण-गंभीर गीत गाऊ लागली.

वायूने ते गीत वाहून नेले......

काळोखातून वाट काढीत एक तरुण आश्रमाजवळ आला.

" कोण हाक मारीत आहे मला ?...." त्याने विचारले.

आवाजाच्या अनुरोधाने तो आश्रमात गेला. मातेच्या पायाशी बसून राहिला.

वायू भारतीचे करुण-गंभीर सूर वाहून नेत होता.

" क्षमा कर, माताजी, क्षमा कर. मी तुझी आज्ञा पाळली नाही. क्षमा कर. " काळोखातून शब्द उमटले.

आणखी एक तरुण भारतीच्या चरणाशी बसून राहिला.

भारतीचे गीतगायन चालू होते.

आणि विशाल आकाशाखाली, त्या महान पर्वताच्या पायथ्याशी ते वहिष्कृत बंधू मातेच्या चरणाशी जमत होते.

पाचही बंधु आश्रमात जमा झाले.

त्यांच्या अंगात पूर्वीचा जोम नव्हता.

त्यांच्या डोळ्यांत पूर्वीची चमक नव्हती.

ते हतबल झाले होते.

निराशेने त्यांना ग्रासले होते.

पण मूळच्या गरीब स्थितीत ते आज पुनः आश्रमात जमा झाले होते. त्यांना आपले बाल्य आठवले. प्रवासास निघण्यापूर्वीचे दिवस आठवले व त्यांना एकमेकांची ओळख पटली.

त्यांनी कडकडून एकमेकांना मिठ्या मारल्या.

त्यांच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या.

भारतीचे ते करुण-गंभीर सूर त्यांच्या हृदयात खोल खोल शिरले. एकदिलाने ते म्हणाले,

"आम्ही आलो आहोत माताजी. थांबव तुझी करुण कहाणी. प्रवासास गेलेले तुझे पुत्र आज तुझ्या चरणांशी एक झाले आहेत. हुकूम व्हावा माताजी."

भारतीने डोळे उघडले. तिला आनंद झाला. चंद्रप्रकाशात गालांवरून ओघळणारे तिचे अश्रू हसू लागले.

तिने आपल्या पाचही पुत्रांना जवळ ओढले. पाचही पुत्रांना वेधेत धरले.

ती गाऊ लागली. डोळ्यांतून गळणाऱ्या अश्रूंनी आपल्या पुत्रांना भिजवू लागली.

त्या गीतात स्वर्गीय जादू होती. त्या गीताने सर्वांना एकजीव केले. त्या गीताने सर्वांच्या देहात नवचैतन्य खेळविले.

पहाटेचा शुक्रतारा अतिशय तेजस्वी दिसत होता.

भारती उठली. आपल्या पाचही पुत्राना आपल्यावरोबर घेऊन ती निघाली.

त्यांचे आत्मबल श्रेष्ठ होते. आणि ते एकीचे अहिंसक बल सदैव श्रेष्ठच ठरणार अशी त्यांची खात्री होती.

भारती राजवाड्याजवळ गेली.

युद्धास आलेली ही छोटी सेना राजाने पाहिली. राजाला त्यांच्या सामर्थ्याची जाणीव झाली. तो खाली आला. आपल्या डोक्याचा मुकुट त्याने भारतीच्या डोक्यावर ठेविला व भारतीला अभिवादन केले.

" क्षमस्व. बाळ, चिरंजीव हो. " भारती म्हणाली.

पश्चात्तापी बाळ भारतीच्या मागे, पाचही बांधवांच्या शेवटी, उभा राहिला.

निसर्गाच्या भाटांनी पहाटेची मंजुळ गाणी गाण्यास सुरुवात केली.

* *

बा. क्र. २९७
किशोर
BVBK-0400297